


दैनिक निडर निर्भिड
जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217
वर्ष ३ रे अंक : ३६६ वा शुक्रवार दि १५ मे २०२६ पृष्ठ ८ किमंत ३ रुपये

# तब्बल १४ वर्षांनी वर्तुळ पूर्ण होणार; शिवसेनेत आनंद येणार?

# बालेकिल्ल्यात शिंदेंचं बेरजेचं राजकारण...

**वृत्तसंस्था/ठाणे**

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आनंद परांजपे यांनी पक्षाला सोडचिठ्ठी देण्याचा निर्णय घेतला आहे. आनंद परांजपे यांनी सोशल मीडियावर याबाबत अधिकृत घोषणादेखील केली आहे. त्यांनी आपला राजीनाम्याचा फोटोदेखील सोशल मीडियावर शेअर केला आहे. ङ्खमनात अनेक भावना दाटून आल्या आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामधील माझा १४ वर्षाचा प्रवास, सर्व नेते, पदाधिकारी, कार्यकर्त्यांचे मिळालेले प्रेम आणि विश्वास कायम स्मरणात राहील. आज अत्यंत जड अंतःकरणाने हा प्रवास इथेच संपवून नव्या वाटेवर पाऊल टाकून नवीन प्रवासाची सुरुवात करीत आहेङ्ख, असं आनंद परांजपे म्हणाले आहेत. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी भाजपसोबत जाण्याचा निर्णय घेतला तेव्हा आनंद परांजपे यांनी त्यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादीत प्रवेश केला होता. आनंद परांजपे यांनी पक्षाला सोडचिठ्ठी देवून दुसऱ्या पक्षात प्रवेश करण्याची ही पहिली वेळ नाही. त्यांनी २०१२ मध्ये पहिल्यांचा शिवसेनेतून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला होता. त्यानंतर राष्ट्रवादी पक्षात फूट पडल्यानंतर त्यांनी अजित पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादीत प्रवेश केला होता. यानंतर ते आता उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेत जाणार असल्याची माहिती आहे. आनंद परांजपे हे तिसऱ्यांदा राजकीय पक्षांतर करणार आहेत. विशेष म्हणजे ते आता पुन्हा शिवसेनेत प्रवेश करणार असल्याची शक्यता आहे. त्यामुळे शिवसेनेत त्यांचं राजकीय पुनर्वसन नेमकं कसं केलं जाणार? ते पाहणं आता महत्त्वाचं होणार आहे. आनंद परांजपे यांनी शिवसेनेत प्रवेश केला तर तब्बल १४ वर्षांचं वर्तुळ पूर्ण होणार आहे. आनंद परांजपे यांनी २०१२ मध्ये शिवसेना पक्षाला सोडचिठ्ठी दिली होती. विशेष म्हणजे तोपर्यंत ते दोनवेळा शिवसेनेचे खासदार म्हणून जनतेतून निवडून आले होते. त्यांचे वडील प्रकाश परांजपे हे सलग चार वेळा ठाण्याचे खासदार म्हणून निवडून आले होते. प्रकाश परांजपे दिवंगत शिवसेना नेते आनंद दिघे यांचे निकटवर्तीय होते. प्रकाश परांजपे यांचं २००८ मध्ये निधन झालं होतं. त्यांच्या निधनानंतर ठाणे लोकसभेची जागा रिक्त झाली होती. त्यावेळी रिक्त जागेवर झालेल्या पोटनिवडणुकीत आनंद परांजपे यांना शिवसेनेकडून उमेदवारी मिळाली होती. त्यावेळी आनंद परांजपे यांचा विजय झाला होता. त्यानंतर २००९ च्या लोकसभा निवडणुकीतही त्यांचा शिवसेनेच्या तिकीटावर विजय मिळवला होता. पण नंतर पक्षांतर्गत गटबाजीमुळे आनंद परांजपे हे शिवसेनेत नाराज असल्याच्या चर्चांना उधाण आलं होतं. आनंद परांजपे यांनी अतिशय नाट्यमयरित्या ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला होता. त्यामुळे अनेकांना धक्का बसला होता. तसेच २०१४ च्या लोकसभा निवडणुकीवेळी कल्याण लोकसभा मतदारसंघात झालेल्या सभेत आनंद परांजपे भावूक झाले होते. त्यानी शिवसेनेतील अंतर्गत गटबाजीवर नारजी व्यक्त केली होती. या निवडणुकीत त्यांचा सामना हा खासदार श्रीकांत शिंदे यांच्या विरोधात झाला होता. या निवडणुकीत श्रीकांत शिंदे यांनी आनंद परांजपे यांचा पराभव केला होता. तेव्हापासून आनंद परांजपे यांना पुन्हा आमदार आणि खासदार होता आलेलं नाही. ते राष्ट्रवादी काँग्रेसचे ठाणे जिल्हाध्यक्ष म्हणून खूप चोखपणे जबाबदारी पार पाडत होते. पण त्यांनी अचानक काही दिवसांपूर्वी एकनाथ शिंदे यांची भेट घेतली. तेव्हापासून ते एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश करणार असल्याच्या चर्चांना उधाण आलेलं होतं. राष्ट्रवादी काँग्रेसचे फुटल्यानंतर आनंद परांजपे यांनी अजित पवार गटाची बाजू भक्कमपणे मांडत पक्षाला मजबुती देण्याचे काम केले. परांजपे हे शिवसेनेचे खासदार असताना आमदार जितेंद्र आव्हाड यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्या उपस्थितीत प्रवेश देऊन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना धक्का दिला होता. तेव्हापासून परांजपे हे आव्हाड यांच्यासोबत होते. त्यांना दोनदा लोकसभेची उमेदवारी देण्यात आली होती. मात्र त्यांना यश आले नाही. त्यानंतर ठाणे जिल्हा अध्यक्ष, प्रवक्ते म्हणून जबाबदारी असताना परांजपे यांनी अचानक जितेंद्र आव्हाड यांची साथ सोडली आणि अजित पवार गटाची जबाबदारी सांभाळली. त्यावेळी परांजपे यांना विधान परिषदेवर पाठविण्याचे आश्वासन अजित पवार यांनी दिले होते. मात्र त्यांच्या नावाचा विचार न करता इतर कार्यकर्त्यांना संधी देण्यात आली. हा प्रकार दोनदा घडल्याने परांजपे नाराज झाले होते.



# खरातसोबत कोणतेही आर्थिक व्यवहार नाही, गुवाहाटीला दर्शनाला कुटुंबिय स्वतंत्र गेलो होतो, चाकणकरांचं स्पष्टीकरण

**वृत्तसंस्था/मुंबई**

समता पतसंस्था गैरव्यवहार प्रकरणी अंमलबजावणी संचालनालयाने ( ) राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या रुपाली चाकणकर यांची सुमारे आठ तास चौकशी केली. या चौकशीनंतर प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना चाकणकर यांनी त्यांचे सर्व आरोप फेटाळून लावले असून, भोंदूबाबा अशोक खरात किंवा संबंधित पतसंस्थेशी आपला कोणताही आर्थिक व्यवहार झाला नसल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले आहे. प्रतिभा चाकणकर आणि तन्मय चाकणकर यांच्या नावे असलेल्या बँक खात्यांबाबत विचारले असता रुपाली चाकणकर म्हणाल्या, ङ्खमी यापूर्वी सुद्धा फेसबुक पोस्टच्या माध्यमातून सांगितलं होतं आणि आज देखील आवर्जून सांगते की, समता पतसंस्थेमध्ये प्रतिभा चाकणकर आणि तन्मय चाकणकर यांच्या नावाने जी खाती उघडली गेली, ती पूर्णपणे बनावट आहेत.त्यांनी पुढे माहिती दिली की, दोघेही कधीही समता पतसंस्थेत गेली नव्हती, त्यांना ती संस्था कुठे आहे हे देखील ठाऊक नाही. ङ्खत्या खात्यांचे ओटीपी थेट अशोक खरातकडे जात होते. त्या ठिकाणी या दोघांच्याही सह्या नव्हत्या. केवळ या दोघांचीच नाही, तर माझ्या माहितीनुसार सव्वाशे ते दीडशे लोकांची अशी बनावट खाती उघडण्यात आली आहेत. ज्या व्यक्तींना घरातून चालताही येत नाही, अशांच्या नावावरही खाती काढली गेली आहेत, असे चाकणकरांनी सांगितले. अशोक खरातसोबतच्या गुवाहाटी येथील हॉटेल ब्ल्यू रेडिसनमधील फोटोंवर स्पष्टीकरण देताना त्या म्हणाल्या, गुवाहाटीचा जो फोटो समोर आला आहे, त्यामध्ये माझ्या कुटुंबासोबत खरातचे कुटुंब आहे. आम्ही त्यांच्यासोबत प्रवास केलेला नाही. दर्शनासाठी आम्ही पुण्यातून स्वतंत्रपणे गेलो होतो. त्यांनी पुढे नमूद केले की, अनेक क्षेत्रातील मान्यवर खरातला गुरु मानत होते आणि त्याच आध्यात्मिक भावनेतून आम्ही दर्शनासाठी गेलो होतो. १७ तारखेला त्याला अटक झाल्यानंतर तो आरोपी असल्याचे आपल्या सर्वांना समजले. तोपर्यंत ती केवळ एक प्रामाणिक श्रद्धा होती, असे त्यांनी म्हटले आहे.




ईडी चौकशीबाबत बोलताना चाकणकरांनी सांगितले की, आमचा कोणताही आर्थिक व्यवहार खरातशी संबंधित नाही आणि कोणताही जमिनीचा व्यवहार झालेला नाही. ईडीच्या चौकशीला पूर्ण सहकार्य केल्याचे सांगून यापुढेही बोलावलं तर चौकशीला जाऊ, असे म्हटले आहे.

# संपूर्ण खासगीकरणाच्या दिशेने

महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभागाने २८ एप्रिल २०२६ रोजी अशासकीय अनुदानित महाविद्यालयांचे खासगी विद्यापीठात रूपांतर करण्याच्या प्रक्रियेचा अभ्यास करण्यासाठी, नियम ठरवण्यासाठी व शिफारशी करण्यासाठी चार सदस्यीय समिती नेमली असल्याचा आदेश काढला आहे. डॉ. भूषण पटवर्धन, तसेच उपसचिव (विद्यापीठ शिक्षण), संचालक व सहसंचालक उच्च शिक्षण विभाग हे या समितीचे सदस्य आहेत.

थोर शिक्षणतज्ज्ञ जे. पी. नाईक यांनी शैक्षणिक पुनर्रचनेच्या पूर्व अटी यामध्ये असे म्हटले आहे, की एक- कोणतेही शिक्षण धोरण समाजाच्या पोकळीत निर्माण होत नाही तर सामाजिक आर्थिक, राजकीय पर्यावरणातून ते आकाराला येते. दोन- शिक्षण हे राजकारण आहे! तीन- भांडवलशाही समाजात शिक्षण धोरण सत्ताधारी वर्गाच्या हितसंबंधांचे संरक्षण करते.

२८ एप्रिलच्या दोन पानी आदेशाचा अर्थ केवळ शब्दांत काय दिला आहे, यावरून लावून चालणार नाही तर जे. पी. नाईकांच्या दृष्टीने त्याकडे पाहिले की नेमका अर्थ कळून येईल! भारताच्या व्यापक शैक्षणिक धोरणाच्या पार्श्वभूमीवर वरील आदेश ही राजकीय शैक्षणिक कृती आहे. भारतात आधीच उच्च शिक्षणाचे खासगीकरण झाले आहे व जी काही थोडीफार अनुदानित महाविद्यालये अस्तित्वात आहेत त्यांच्या खासगीकरणाची ही पूर्वतयारी आहे.

आशा २०२१-२२ च्या आकडेवारीनुसार महाराष्ट्रात ४,६८५ महाविद्यालय आहेत, त्यातील ६३.५२ टक्के (२,९७६) महाविद्यालये खासगी विनाअनुदानित आहेत, २४.९० टक्के (१,१६७) महाविद्यालये ही अशासकीय अनुदानित आहेत व दहा टक्के (५४२ ) महाविद्यालये शासकीय आहेत. खासगी विनाअनुदानित महाविद्यालयांत महाराष्ट्रातील उच्च शिक्षणातील विद्यार्थ्यांच्या ४१.९५ टक्के विद्यार्थी तर, अशासकीय अनुदानित महाविद्यालयात ४७ टक्के विद्यार्थी आहेत व ११ टक्के विद्यार्थी शासकीय महाविद्यालयांत जातात म्हणजे विनाअनुदानित महाविद्यालयांची टक्केवारी जास्त, पण विद्यार्थी टक्केवारी कमी आहे तर अनुदानित व शासकीय महाविद्यालयांची टक्केवारी कमी, पण विद्यार्थ्यांची टक्केवारी जास्त आहे.

हा फरक न परवडणारे शिक्षण यामुळे झाला आहे! विनाअनुदानित महाविद्यालयांचे शुल्क सामान्य पालकांच्या आवाक्याबाहेर असते. त्यामुळे विद्यार्थी प्रथम अनुदानित व शासकीय महाविद्यालयांना प्राधान्य देतो व शेवटी नाइलाजाने विनाअनुदानित महाविद्यालयात प्रवेश घेतला जातो. याचे प्रमुख कारण असे की, खासगी विनाअनुदानित शिक्षण संस्थेत शिक्षण हा नफेखोरीचा व्यवसाय झाला आहे, पैसे नसणारे शिक्षणातून बाहेर फेकले जात आहेत, शुल्क व गुणवत्ता याचा काहीही संबंध राहिलेला नाही, शासकीय नियम उघडपणे धाब्यावर बसवले जात आहेत, प्राध्यापक व कर्मचारी यांचे पगार, सेवाशर्ती याकडे अक्षम्य दुर्लक्ष केले जात आहे. जाहिरातबाजी, शो, प्रचंड मोठ्या इमारती यांसह सत्ताधाऱ्यांच्या वळचणीला राहून सर्व त्रुटी झाकण्याचा प्रयत्न केला जात असतो. गरीब, कष्टकरी, शोषित घटकांच्या मुलांना अनुदानित महाविद्यालयांचा जो काही काडीचा आधार मिळत आहे, तो २८ एप्रिलच्या आदेशाने काढून घेतला जाणार आहे.

महाराष्ट्रात १९८१ मध्ये वसंतदादा पाटील यांनी विनाअनुदानित महाविद्यालयांना मान्यता देण्याचे धोरण अवलंबले होते. १९९१ च्या




जागतिकीकरण, उदारीकरण, खासगीकरण व बाजारीकरणाच्या धोरणामुळे समाजाच्या सर्वच क्षेत्रांत खासगीकरणाची प्रक्रिया सुरू झाली. शिक्षण क्षेत्र त्याला अपवाद राहिले नाही. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये शिक्षणाच्या खासगीकरणाला प्रोत्साहन देण्याची भूमिका घेतली गेली आहे. या संपूर्ण धोरणाचा छुपा अजेंडा समाजातल्या धनदांडग्या गटाला शिक्षणाची संधी द्यायची व उरलेल्यांना शिक्षणाच्या प्रवाहातून बाहेर ढकलायचे हाच आहे! धोरणाची भाषा कितीही मिठ्ठास असली, भाषेचा कितीही फुलोरा असला तरी मूळ उद्देश वेगळा आहे. काही थोड्या मुलांनी उच्च शिक्षणात जावे व उरलेल्यांनी आधुनिक बलुतेदारीच्या व्यवसाय कौशल्य विकासाकडे जावे हा या धोरणाचा छुपा अजेंडा आहे.






*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# तीन दिवसांत चर्चा? डोनाल्ड ट्रम्प यांचे संकेत; इराणच्या भूमिकेबाबत संभ्रम

■ मणिपूर/वृत्तसंस्था



अमेरिका-इराण यांच्यात दुसऱ्या फेरीची चर्चा येत्या तीन दिवसांत होऊ शकते असे संकेत अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दिले आहेत. या घडामोडी पुढील ३६ ते ७२ तासांत शक्य असल्याचे ट्रम्प यांनी नमूद केल्याचे 'न्यूयॉर्क पोस्ट' च्या वृत्तात म्हटले आहे. इराणने मात्र अमेरिकेच्या प्रस्तावाला कोणताही ठोस प्रतिसाद दिलेला नाही.

डोनाल्ड ट्रम्प यांनी होमुर्झ सामुद्रधुनीत अमेरिकी नाकेबंदी कायम ठेवत शस्त्रसंधीची मुदत वाढविली आहे. पाकिस्तानच्या विनंतीवरून ही मुदत वाढवली असून, इराणच्या नेतृत्वाला चर्चेसाठी व्यापक प्रस्ताव तयार करण्यास वेळ मिळेल असे त्यांनी स्पष्ट केले. शस्त्रसंधीनंतरही या परिसरात युद्धझळा कायम आहेत. इराणने बुधवारी होर्मुझ सामुद्रधुनीमध्ये तीन जहाजांवर गोळीबार केला आणि त्यापैकी दोन जहाजे ताब्यात घेतली. यापैकी एक मालवाहू जहाज गुजरातच्या मुंद्रा बंदराकडे जात होते. चर्चेत सहभागी होण्याबाबत कोणताही निर्णय झालेला नाही असे इराणच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते इस्माईल बाकाई यांनी सांगितले. पहिल्या फेरीतील चर्चेत आम्ही चांगल्या भावनेने सहभागी झालो मात्र वाटाघाटी करणाऱ्यांकडे गांभीर्य नव्हते असा आरोप त्यांनी केला. युद्धविरामाची मुदतवाढ ही ट्रम्प यांची खेळी असू शकते, असे इराणच्या पार्लमेंटचे अध्यक्ष महंमद कालिबाफ म्हणाले. युद्धविरामाला मुदतवाढ देण्यापूर्वी ट्रम्प यांनी हल्ल्याचे इशारे सातत्याने दिले याकडेही त्यांनी लक्ष वेधले.

होर्मुझच्या सामुद्रधुनीत तीन मालवाहू जहाजांवर इराणच्या रिव्होल्युशनरी गार्डने गोळीबार केल्याची माहिती ब्रिटनच्या सागरी सुरक्षा संस्थेने दिली. या हल्ल्यामुळे युद्ध संपवण्याच्या प्रयत्नांवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. लायबेरियाचा ध्वज असलेले 'एपामिनोंडास' आणि पनामाचा ध्वज असलेले 'एमएससी फ्रान्सिस्का' ही जहाजे रिव्होल्युशनरी गार्डने ताब्यात घेतली आहेत. 'मरिन ट्रॅफिक'च्या जहाज ट्रॅकिंग डेटानुसार 'एपामिनोंडास' हे जहाज गुजरातच्या मुंद्रा बंदराकडे जात होते. तिसरे जहाज 'युफोरिया'चा ताबा घेतला नसला तरी त्यावर हल्ला करण्यात आल्याचे सूत्रांनी सांगितले.

गेल्या काही दिवसांपासून अमेरिकी सैन्याने नाकेबंदी भेदून आत शिरण्याचा प्रयत्न करणाऱ्या काही इराणी तेलवाहू जहाजांना जप्त केल्यानंतर लगेचच हे हल्ले झाले आहेत. अमेरिकेने असाही दावा केला आहे की, या प्रदेशातील त्यांच्या सैन्याने इराणी बंदरांमधून बाहेर पडण्याचा किंवा आत शिरण्याचा प्रयत्न करणाऱ्या सुमारे ३० जहाजांना मार्ग बदलण्यास भाग पाडले आहे. इराणने अमेरिकेच्या नाकेबंदीचा निषेध करत तिला 'सशस्त्र चाचेगिरी' आणि शस्त्रसंधीचा भंग असे म्हटले आहे.

होर्मुझ सामुद्रधुनी बंद आणि अमेरिका-इराण यांच्यातील शांतता चर्चेत कोणतीच प्रगती न झाल्याने त्याचा परिणाम तेलाच्या किमतीवर झाला. बुधवारी तेलाच्या किमती दोन टक्क्यांनी वाढल्या आणि आधीची घसरण भरून निघाली. ब्रेंट क्रूड १.७१ डॉलरने म्हणजेच १.७ टक्क्यांनी वाढून प्रति पिंप १००.९१ डॉलरवर पोहोचले आहे. शांतता काळात होर्मुझ सामुद्रधुनीतून जागतिक तेल आणि द्रवीकृत नैसर्गिक वायूच्या पुरवठ्यापैकी सुमारे २० टक्के वाहतूक होत असे. मात्र ही सामुद्रधुनी बंद झाल्याने जागतिक इंधनसाखळी विस्कळीत झाली आहे. दरम्यान, रशियाने कझाक पाइपलाइनमधून जर्मनीला होणारी तेल निर्यात थांबवल्याची पुष्टी केली. हा तेलपुरवठा इतर मार्गांवर वळवला जाईल, असे रशियाने म्हटले आहे.

## शिखर बँक आर्थिक गैरव्यवहार प्रकरणाला पूर्णविराम; रोहित पवार निर्दोष

■ मुंबई/वृत्तसंस्था

राज्याची शिखर बँक असलेल्या महाराष्ट्र राज्य सहकारी बँक (एमएससीबी) घोटाळ्याशी संबंधित आर्थिक गैरव्यवहार प्रकरणातून राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार) आमदार रोहित पवार यांना विशेष सत्र न्यायालयाने दोषमुक्त केले. त्यामुळे या प्रकरणाला पूर्णविराम मिळाला आहे.

या प्रकरणी मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने दाखल केलेल्या मूळ गुन्ह्याचा तपास बंद झाला आहे. प्रकरण बंद करण्याची शिफारस करणारा आर्थिक गुन्हे शाखेने दाखल केलेला अहवाल विशेष न्यायालयाने स्वीकारला होता. त्यामुळे, या गुन्ह्याच्या आधारे सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) या प्रकरणी दाखल केलेले प्रकरण कायम राहू शकत नाही, असा दावा करून रोहित यांनी दोषमुक्तीच्या मागणीसाठी विशेष न्यायालयात अर्ज केला होता. आपल्याविरुद्ध ईडीने केलेले आरोप हे खोटे असून आपल्याविरुद्ध खटला दाखल केला जाऊ शकत नाही, असा दावाही रोहित यांनी अर्जात केला होता. रोहित यांच्यासह अन्य आरोपींविरुद्ध ईडीने दाखल केलेल्या आरोपपत्राची विशेष न्यायालयाने दखल घेतली होती. तसेच, फसवणुकीद्वारे केल्या गेलेल्या साखर कारखान्याच्या लिलावात रोहित पवार हे सहभागी असल्याचे सकृतदर्शनी निष्पन्न झाले होते, असे निरीक्षण नोंदवले होते. विशेष न्यायालयानेही त्यांना जामीनही मंजूर केला होता. ईडीने दाखल केलेल्या पुरवणी आरोपांनुसार, कन्नड सहकारी साखर कारखाना हा रोहित पवार यांच्या बारामती ॲग्रो लिमिटेडच्या मालकीचा आहे. या साखर कारखान्याचे ८०.५६ कोटी रुपयांचे थकीत कर्ज वसूल करण्यासाठी शिखर बँकेने १३ जुलै २००९ रोजी सरफेसी कायद्याअंतर्गत त्यांच्या सर्व मालमत्ता ताब्यात घेतल्या. त्यानंतर शिखर बँकेने ३० ऑगस्ट २०१२ रोजी एका कथित मूल्यांकन अहवालाच्या आधारे अत्यंत कमी किंमत निश्चित करून कन्नड सहकारी साखर कारखान्याचा लिलाव केला. बारामती ॲग्रो लिमिटेड व्यतिरिक्त इतर दोन पक्ष बोली प्रक्रियेत सहभागी झाले. सर्वाधिक बोली तांत्रिकदृष्ट्या कमकुवत कारणांमुळे अपात्र ठरवण्यात आली, तर दुसरी बोली लावणारा व्यावसायिक बारामती ॲग्रो लिमिटेडशी संबंधित होता.

## खरगे यांना निवडणूक आयोगाची नोटीस; 'त्या' वक्तव्यावरून स्पष्टीकरण देण्याचे आदेश

■ नवी दिल्ली, वृत्तसंस्था :



पंतप्रधान नरेंद्र मोदींना 'दहशतवादी' म्हटल्याबद्दल काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांना केंद्रीय निवडणूक आयोगाने बुधवारी नोटीस बजावली. २४ तासांमध्ये स्पष्टीकरण देण्याचे आदेशही आयोगाने खरगे यांना काढले. यासंदर्भात भाजपच्या शिष्टमंडळाने आयोगाची भेट घेऊन खरगेंविरोधात लेखी तक्रार नोंदवली होती.

भाजपच्या उच्चस्तरीय शिष्टमंडळाने बुधवारी केंद्रीय निवडणूक आयोगाची भेट घेतली. खरगेंच्या टिप्पणीमुळे आम्ही अत्यंत दुखी झालो आहोत. आम्ही आमची संतप्त प्रतिक्रिया आयोगासमोर मांडली. खरगे यांनी ज्या प्रकारे पंतप्रधान मोदींचा अवमान केला, तो सहन करता येणार नाही. म्हणूनच आम्ही आयोगाच्या मुख्यालयात जाऊन तक्रार नोंदवली.

पंतप्रधानांना 'दहशतवादी' म्हणणे हा संपूर्ण देशाचा अपमान आहे, असे केंद्रीय संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी या भेटीनंतर पत्रकारांना सांगितले. भाजपच्या शिष्टमंडळात रिजिजू यांच्यासह केंद्रीय मंत्री निर्मला सीतारामन, अर्जुराम मेघवाल आदींचा समावेश होता. खरगेंच्या या टिप्पणीवर भाजपने तीव्र आक्षेप घेतला असून खरगेंवर कारवाई करण्याची मागणी केली. तामीळनाडूचे भाजपचे निवडणूक प्रभारी पीयूष गोयल यांनी खरगे यांनी देशाची माफी मागावी, अशी मागणी केली आहे.

तमिळनाडूमध्ये निवडणूक प्रचाराच्या शेवटच्या दिवशी, मंगळवारी खरगे यांनी चेन्नईमध्ये ही टिप्पणी केली. पेरियार, डॉ. आंबेडकर, अण्णादुराई, कमलराज आणि कळैग्नर या व्यक्तींनी महिला आरक्षण, न्याय, समानता आणि बंधुभाव या तत्त्वांचा पुरस्कार केला. मोदी या तत्त्वांचे पुरस्कर्ते नाहीत. मग, अण्णाद्रमुक पक्ष मोदींशी हातमिळवणी कशी करू शकतो? मोदी एक दहशतवादी आहेत. त्यांचा समानतेवर विश्वास नाही. त्यांचा पक्षही समानता आणि न्यायावर विश्वास ठेवत नाही, असे खरगे म्हणाले होते.

मोदी ईडी, आयटी यासारख्या केंद्रीय संस्था व यंत्रणांचा विरोधकांना धमक्या देण्यासाठी वापर करतात. या सर्व संस्था त्यांच्या ताब्यात आहेत. आता तर लोकसभेच्या मतदारसंघांची फेररचनाही त्यांनी आपल्या हाती घेतली आहे. त्या संदर्भात मी टिप्पणी केली होती. मी असे म्हटले होते की, मोदी लोकांमध्ये आणि राजकीय पक्षांमध्ये दहशत निर्माण करत आहेत. मी त्यांना 'दहशतवादी' असे कधीच म्हटले नव्हते, असे खरगे म्हणाले.

## चौकशीतील मुख्यमंत्र्यांच्या हस्तक्षेपामुळे लोकशाही धोक्यात : सर्वोच्च न्यायालय

■ नवी दिल्ली, वृत्तसंस्था :

सक्तवसुली संचालनालयाच्या (ईडी) कोलकात्यातील छापे कारवाईत पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी केलेल्या कथित हस्तक्षेपावर सर्वोच्च न्यायालयाने बुधवारी तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त केली. 'कोणत्याही चौकशी किंवा तपासादरम्यान मुख्यमंत्र्याने केलेली ढवळाढवळ लोकशाहीला धोक्यात घालणारी आहे' अशी टिप्पणी करत हे प्रकरण राज्य विरुद्ध केंद्र सरकारमधील वादाचे आहे, असे माणण्यास सर्वोच्च न्यायालयाने नकार दिला. इंडियन पॉलिटिकल ॲक्शन कमिटी (आय-पॅक) या राजकीय सल्लागार कंपनीच्या कोलकात्यातील कार्यालयावर 'ईडी'ने यावर्षी ८ जानेवारी रोजी छापा घातला होता. त्या छाप्यादरम्यान ममता बॅनर्जी यांनी हस्तक्षेप केला, असा आरोप ईडीने याचिकेद्वारे सर्वोच्च न्यायालयात केला होता. त्यावर बुधवारी न्या. प्रशांत कुमार मिश्रा आणि न्या. एन. व्ही. अंजारिया यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली.

या प्रकरणाचे मूळ राज्य आणि केंद्र सरकारमधील राजकीय वादाचे आहे, असा युक्तिवाद प. बंगालच्या सरकारी अधिकाऱ्यांच्या वतीने ज्येष्ठ अभिवक्त्या मेनका गुरुस्वामी यांनी केला. मात्र, तो फेटाळून लावताना खंडपीठाने ममता बॅनर्जी यांच्या कृतीवर कडक ताशेरे ओढले. 'राज्याच्या मुख्यमंत्र्यांकडून घडलेली ही कृती संपूर्ण व्यवस्था आणि लोकशाहीला संकटात टाकणारी आहे. अशा वेळी तो राज्य



आणि केंद्र यांच्यातील निव्वळ वाद उरत नाही', असे न्या. मिश्रा म्हणाले. संविधानाच्या पायाभूत चौकटीच्या सिद्धांताचे दाखले देणारे अनेक निकाल आमच्यासमोर मांडण्यात आले. मात्र, यापैकी एकाही निकालाने मुख्यमंत्र्याकडून हे कृत्य केले जाईल, याची कल्पना केली नसावी, अशी टिप्पणी खंडपीठाने केली. प. बंगालमधील विशेष सखोल फेरतपासणी (एसआयआर) प्रक्रियेदरम्यान न्यायिक अधिकाऱ्यांना बंदी बनवण्यात आल्याचा दुसरा खटला सर्वोच्च न्यायालयात सुरू आहे. त्या प्रकरणाचा उल्लेख करत 'राज्यात जे सुरू आहे, त्याकडे आम्ही डोळेझाक करू शकत नाही' असे खंडपीठाने म्हटले. ईडीची याचिका पाच सदस्यीय खंडपीठाकडे वर्ग करण्याची मागणीही खंडपीठाने अमान्य केली.

## १९ वर्षीय आरोपीबाबत धक्कादायक माहिती समोर..

# IRS अधिकाऱ्याच्या मुलीची मोबाइल चार्जरने गळा आवळून हत्या

■ दिल्ली/वृत्तसंस्था

दिल्लीतील एका घरात बुधवारी सकाळी भारतीय महसूल सेवा (IRS) अधिकाऱ्याच्या २२ वर्षीय मुलीवर लैंगिक अत्याचार करून मोबाइल चार्जरच्या वायरने गळा आवळून तिची हत्या करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणात आयआरएस अधिकाऱ्याच्या घरी पूर्वी घरकाम करणाऱ्या १९ वर्षीय राहुल मीना याला दिल्लीतील द्वारका येथून अटक करण्यात आली आहे. गुन्हा घडल्यानंतर अवघ्या १० तासांत त्याला बेड्या ठोकण्यात आल्या. दरम्यान घटनेचा तपास करत असलेल्या दिल्ली पोलिसांनी मीना याच्याबद्दल काही धक्कादायक खुलासे केले आहेत.

पोलिसांनी सांगितले की, मीना हा राजस्थानच्या अलवर जिल्ह्यातील राजगड येथून १८ महिन्यांपूर्वी दिल्लीतील या कुटुंबाकडे काम करण्यासाठी आला होता.

"पीडितेच्या वडिलांना अलवरमधील कुठल्यातरी जीएसटी अधिकाऱ्याने फोन केला होता, ज्यांनी सांगितले की मीना हा त्यांच्या कार्यालयात काम करायचा आणि तो त्यांच्या कामाला येईल... त्या अधिकाऱ्यांनी त्याला कामावर ठेवण्याची विनंती केली होती. त्यामुळे, कुटुंबाने कोणतीही पडताळणी न करताच त्याला कामावर ठेवले," असे एका



अधिकाऱ्याने सांगितले.

एका शेजाऱ्याने सांगितले की, मीना हा इमारतीच्या पार्किंगमध्ये असलेल्या नोकरांसाठीच्या खोलीत राहायचा. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, या घरात काम सुरू केल्यानंतर काही महिन्यांतच, मीनाने कुटुंबाने त्याच्यावर टाकलेल्या विश्वासाचा गैरफायदा घेण्यास सुरुवात केली होती. तो दुकानात जायचा, घरासाठी आवश्यक वस्तू विकत घ्यायचा आणि त्याचे पैसे कुटुंबाच्या खात्यावर लिहायला सांगायचा... तो दुकानदारांना महिन्याच्या अखेरीस कुटुंबाकडून पैसे घेण्यास सांगायचा आणि पैसे स्वतःकडे ठेवायचा," असे पोलीस अधिकाऱ्याने सांगितले.

एका स्थानिक केमिस्टने सांगितले की, "तो एकदाच ४००-५०० रुपयांची औषधे विकत घ्यायचा आणि मला त्याचे पैसे त्याच्या मालकाकडून घेण्यास सांगायचा. मुलगा सभ्य दिसतायचा आणि मृदू भाषेत बोलायचा, त्यामुळे मी त्याच्यावर विश्वास ठेवायचो."

"पण नंतर वडिलांनी मला पैसे घेतल्याशिवाय राहुलला औषध न देण्याची ताकीद दिली," असेही दुकानदाराने सांगितले. पोलिसांनी सांगितले की, मीना दुकानातून वस्तू खरेदी करायचा पण त्याचे पैसे देत नसल्याबद्दल कुटुंबाकडे अनेक तक्रारी आल्या होत्या. अखेर, दोन महिन्यांपूर्वी जेव्हा शेजाऱ्यांनी तक्रार केली की त्याने त्यांच्याकडून कथितरीत्या दीड लाख रुपयांचे कर्ज घेतले आहे, तेव्हा त्याला कामावरून काढून टाकण्यात आले. "घरात काम करणारे येत जात असतात, आणि नियम मोडल्यास बऱ्याचदा त्यांना काढून टाकले जाते. त्याला फक्त नम्रपणे निघून जाण्यास सांगितले होते," असे कुटुंबातील एका सदस्याने सांगितले. पण राहुलने हे मनावर घेतल्याचे पोलीस म्हणाले. प्राथमिक तपासात असे समोर आले की त्याला बेटिंग ॲप्सचा नाद होता आणि तो अमली पदार्थांच्या आहारी गेलाला आहे," असे एका अधिकाऱ्याने सांगितले. पोलिसांनी पुढे असेही सांगितले की, राहुल मंगळवारी रात्री राजगडमध्ये होता आणि दिल्लीला येण्यापूर्वी त्याने तिथे एका महिलेचा विनयभंग केल्याचा आरोप आहे. याप्रकरणी बुधवारी सकाळी अलवर पोलिसांनी गुन्हा दाखल केला असल्याचेही पोलिसांनी सांगितले.

पुढे पोलिसांनी सांगितले की, राहुलने कथितपणे मंगळवारी ती मोबाइल फोन १३ हजार रुपयांना विकले आणि अलवरहून दिल्लीला येण्यासाठी ६ हजार रुपये देऊन एक ॲम्बुलन्स म्हणून वापरली जाणारी कार बुक केली. पण दिल्लीत पोहचल्यावर तो चालकाल पैसे न देताच गाडीतून उतरून पळून गेला. "राहुलने त्याचा स्वतःचा फोन १० हजार रुपयांना आणि त्याच्या भावाचा आणि मित्राचा फोन प्रत्येकी ३ हजार रुपयांना एका स्थानिक दुकानदाराला विकला... त्याने कथितपणे दुकानदाराला सांगितले होते की, तो परत येऊन त्याचे पैसे परत करेल आणि आपले सर्व फोन पुन्हा विकत घेईल," असे एका अधिकाऱ्याने सांगितले. "तपासात असेही समोर आले आहे की, तो एका खासगी रुग्णालयाची रुग्णवाहिका म्हणून वापरल्या जाणाऱ्या Eeco व्हॅनमधून दक्षिण दिल्लीत आला होता. ज्या घरी त्याला जायचे होते, ते घर शोधण्याच्या बहाण्याने तो गाडीतून उतरला आणि ड्रायव्हरला पैसे न देताच तिथून पळून गेला. तिथून तो चालत पीडितेच्या घरी पोहोचला," असे अधिकाऱ्याने पुढे सांगितले

## अयानची पोलिसांनी काढली धिंड!



■ बारामती/वृत्तसंस्था

परतवाडा येथील लैंगिक शोषण आणि आक्षेपार्ह चित्रफिती प्रसारित करण्याच्या प्रकरणात मुख्य आरोपी अयान अहमद याच्यासह चार आरोपींच्या पोलीस कोठडीत वाढ करण्यात आल्यानंतर पोलिसांच्या तपासानेही गती घेतली आहे. आज बुधवारी अयानला सोबत घेऊन पोलिसांनी अचलपुरात त्याची 'वरात' काढली. यावेळी आरोपी अयानला धड चालताही येत नसल्याचे दिसून आले. मान खाली घालून तो लंगडत चालताना दिसून आला.

अयान याने काही दिवसांपुर्वी एक आयफोन नुमान नावाच्या एका मित्राला विकला असल्याची माहिती पोलिसांना चौकशीदरम्यान दिली होती. त्या माहितीच्या आधारे पोलिसांनी आज सरमसपुरा परिसरातील नुमानच्या घरी अयानला पायीच नेले. सरमसपुरा पोलीस ठाण्यापासून त्याची अक्षरश: वरात काढण्यात आली. यावेळी कडक पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. परतवाडा पोलीस ठाण्यातून त्याला आधी वाहनातून सरमसपुरा पोलीस ठाण्यात नेण्यात आले. तेथून त्याला पायी नेण्यात आले.

पोलिसांनी अयानचा मित्र नुमान याच्या घरी पोहचून झडती घेतली. त्याच्याकडून अयानने त्याला विकलेला आयफोन जप्त केला. या मोबाईलमध्ये काही आक्षेपार्ह चित्रफिती किंवा छायाचित्रे असल्याचा संशय पोलिसांना आहे. हा मोबाईल तपासणीसाठी न्यायवैद्यक प्रयोगशाळेत पाठविण्यात येणार आहे.

या प्रकरणात आरोपींकडून जप्त करण्यात आलेले ५ मोबाइल तसेच या व्यतिरिक्त जप्त करण्यात आलेले इतर ७ मोबाइल, १ लॅपटॉप, १ टॅब आणि १ हार्ड डिस्क त्वरित विश्लेषणासाठी न्यायवैद्यक प्रयोगशाळेत पाठविण्यात आले आहेत. आरोपींकडून जप्त करण्यात आलेल्या मोबाइलमध्ये ८ पीडित मुलींच्या १८ चित्रफिती आणि ३९ छायाचित्रे आढळून आली. या चित्रफिती इतरांना प्रसारित करणाऱ्या इतर ७ आरोपींनादेखील तपासादरम्यान अटक करण्यात आली आहे.

## पर्यटक महिलेवर कर्नाटकातील होमस्टेमध्ये बलात्कार

**नवी दिल्ली :** अमेरिकेतील एका पर्यटक महिलेवर कर्नाटकमधल्या एका होमस्टे सुविधेच्या कर्मचाऱ्यानं लैंगिक अत्याचार केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. कर्नाटकच्या कोडगू जिल्ह्यातल्या कुट्टा परिसरातील एका होमस्टेमध्ये ही घटना घडली. या प्रकरणी पीडित पर्यटक महिलेनं होमस्टेमधील कर्मचारी व मालकाविरोधात गुन्हा दाखल केला असून त्या दोघांना अटक करण्यात आली आहे. गंभीर बाब म्हणजे आपल्या कर्मचाऱ्यानं केलेला गुन्हा लपवण्यासाठी मालकानं तीन दिवस होमस्टेचं इंटरनेट बंद केलं होतं. पीडित महिलेलाही या काळात त्यानं डांबून ठेवलं होतं. समोर आलेल्या माहितीनुसार, सदर महिला कर्नाटकमध्ये पर्यटनासाठी आली असता कुट्टा भागातील या होमस्टेमध्ये तीन दिवसांसाठी वास्तव्यास होती. गेल्या आठवड्यात तिथे वास्तव्य करत असताना होमस्टेमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्याने तिच्यावर बलात्कार केला. हा सगळा प्रकार समजल्यानंतर होमस्टेच्या मालकानं तो दडवून ठेवण्यासाठी तिथलं इंटरनेट तीन दिवस बंदच ठेवलं. शिवाय, पीडित महिलेनं हा प्रकार इतर कुणाला सांगू नये, यासाठी तिला तीन दिवस होमस्टेमध्येच डांबून ठेवलं. आपल्यावर झालेल्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी पीडित महिलेनं अखेर होमस्टेच्या मालकाला आपण मैसूरला निघून जातोय, असं खोटं सांगितलं. तिथून निसटल्यानंतर पीडित महिलेनं थेट अमेरिकी दूतावासाशी संपर्क साधला. घडलेला सर्व प्रकार तिने दूतावासात कळवला.

## केरळमध्ये फटाक्यांच्या कारखान्यात विस्फोट, 13 जणांचा दुर्दैवी मृत्यू



■ त्रिशूर, वृत्तसंस्था :

केरळच्या त्रिशूर जिल्ह्याच्या मुंडथिक्कोडु भागात मंगळवारी एका फटाक्यांच्या कारखान्यात भीषण विस्फोट झाला आहे. या विस्फोटात 13 जणांचा मृत्यू झाला असून अनेक जण जखमी झाले आहेत. त्रिशूर शहरात होणाऱ्या वार्षिक मंदिर उत्सव पूरमची तयारी सुरू असताना ही दुर्घटना घडली आहे. या दुर्घटनेबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदींनी दु:ख व्यक्त केले आहे.

विस्फोटावेळी युनिटमध्ये सुमारे 40 जण काम करत होते. 7 जण या दुर्घटनेतून बचावले असल्याचे एका अधिकाऱ्याने सांगितले. त्रिशूर पूरमच्या थिरुवंबाडी गटासाठी आतषबाजीचे नमुने तयार केले जात असताना कारखान्यात हा विस्फोट झाला.

घटनास्थळावर मोठ्या प्रमाणात विस्फोटक सामग्री ठेवण्यात आली होती, ज्याला आग लागल्यावर मोठे विस्फोट झाले. प्रारंभिक माहितीत जवळपास 40 जण जखमी झाल्याची बाब समोर आली होती, ज्यातील कमीतकमी 8 जणांची प्रकृती गंभीर असल्याचे सांगण्यात आले होते.

तर दुर्घटनेनंतर प्रशासनाने त्रिशूर मेडिकल कॉलेजसमवेत आसपासच्या रुग्णालयांना अलर्टवर राहण्याचा निर्देश दिला. विस्फोटानंतर परिसरात मोठ्या प्रमाणात धूर अन् आग फैलावल्याने बचावकार्यात अडथळे निर्माण झाले. घटनास्थळी अर्धवट जळालेल्या विस्फोटकांमुळे बचावकार्य प्रभावित झाले. पोलीस आणि आपत्कालीन सेवांच्या पथकाने घटनास्थळी पोहोचत स्थितीवर नियंत्रण मिळविण्याचा प्रयत्न केला. परंतु विस्फोट इतका शक्तिशाली होता की याचा आवाज अनेक किलोमीटर अंतरावरही ऐकू आला.


# "प्रभसिमरनचं वजन वाढलं, खेळाडू सुस्तावले", पंजाब संघासंबंधित अफवांवर प्रिती संतापली

**मुंबई, वृत्तसंस्था :**

पंजाब किंग्सने आपल्या आयपीएल २०२६ मोहिमेची सुरुवात दणक्यात केली होते. सलग सहा सामने जिंकल्यानंतर आता प्लेऑफच्या तोंडावर आल्यानंतर संघाने ४ सामने गमावली आहेत. संघाच्या पराभवाच्या मालिकेदरम्यान समोर आलेल्या काही बातम्यांमुळे आता पंजाब किंग्सचे व्यवस्थापन आणि प्रीती झिंटा संतापले आहेत.

सलग चार पराभवांनंतर, सलामीवीर प्रभसिमरन सिंगचे वजन १० किलोने वाढल्याच्या वृत्ताचे प्रीती झिंटा आणि पंजाब किंग्सच्या व्यवस्थापनाने स्पष्टपणे खंडन केले आहे. त्यांनी याला केवळ संघाच्या ब्रँडिंगला नुकसान पोहोचवण्यासाठी पसरवलेले खोटे म्हटले आहे.





पंजाब किंग्सच्या सलग चार पराभवांनंतर, संघात मोठ्या प्रमाणावर बेशिस्त असल्याचे सांगणारा एक अहवाल समोर आला. त्यात म्हटलं होतं की, गेल्या आठवड्यात प्रभसिमरन सिंगचे वजन १० किलोने वाढले होते. खेळाडूही निवांत होते, पहाटेपर्यंत गेम्स खेळून नंतर सराव सत्र चुकवत होते. खेळाडूंची विमाने चुकत होती आणि ते सामने हरत आहेत. त्यामुळे त्यांचा फॉर्म खराब असणे यात आश्चर्य नाही. प्रीती झिंटा आणि पंजाब किंग्स व्यवस्थापनाने आता अशा वृत्तांवर प्रतिक्रिया दिली आहे. आपल्या निवेदनात त्यांनी ही वृत्त पूर्णपणे मूर्खपणाची आणि खोटी असल्याचं म्हटलं आहे. प्रीती झिंटा म्हणाली की, "टीका आणि हेतुपुरस्सर चुकीची माहिती पसरवणं यात फरक आहे. खेळाबद्दलची चर्चा स्वागतार्ह आहे, परंतु एखाद्या संघाला किंवा ब्रँडला हानी पोहोचवण्याच्या उद्देशाने हेतुपुरस्सर खोटी माहिती पसरवणे खपवून घेतले जाणार नाही. झिंटाने सांगितलं की, विश्वसनीय स्रोत आणि माध्यम व्यावसायिकांसह सर्वांनी अशी चुकीची माहिती पसरवण्यापूर्वी जबाबदारी घ्यावी, असे आवाहन ती करते."

पंजाब किंग्सने म्हटलं आहे की, "क्षुल्लक प्रसिद्धी मिळवण्यासाठी खोट्या बातम्या आणि बनावट गोष्टी पसरवणं हा खेळाचा भाग नाही. चुकीची माहिती पसरवण्यापूर्वी सर्वांनी तथ्यांची पडताळणी करावी, असे आम्ही आवाहन करतो." कर्णधार श्रेयस अय्यरच्या नेतृत्वाखालील पंजाब किंग्सने आयपीएल २०२६ मध्ये आतापर्यंत ११ सामने खेळले असून, त्यापैकी सहा सामने जिंकले आहेत आणि चार गमावले आहेत. एका सामन्यात त्यांना गुण विभागून घ्यावे लागले. या ११ सामन्यांनंतर, त्यांचे १३ गुण झाले आहेत आणि ते गुणतालिकेत चौथ्या स्थानावर असून, प्लेऑफसाठीच्या शर्यतीत आहेत.

## हैदराबाद फक्त ८६ धावांवर ऑलआऊट! गुजरातचा विजय

**मुंबई /वृत्तसंस्था**

गुजरात टायटन्सने सनरायझर्स हैदराबादच्या फलंदाजी फळीला सुरुंग लावत दणदणीत विजयाची नोंद केली आहे. गुजरातने हैदराबादचा धावांनी पराभव करत गुणतालिकेत पहिलं स्थान गाठलं आहे. यासह गुजरात टायटन्स संघाचे सर्वाधिक १६ गुण झाले आहेत, यासह त्यांचं प्लेऑफमधील स्थान जवळपास निश्चित झालं आहे. गुजरातच्या गोलंदाजीसमोर हैदराबादचा संघ फक्त ८७ धावांवर सर्वबाद झाला.

गुजरात टायटन्सने प्रथम फलंदाजी करत साई सुदर्शन व वॉशिंग्टन सुंदर यांच्या अर्धशतकांच्या बळावर १६८ धावांचं आव्हान दिल. तर प्रत्युत्तरात हैदराबादचा कोणताच संघ २० धावांचा आकडाही पार करू शकला नाही, परिणामी संघ अवघ्या ८७ धावांवर सर्वबाद झाला. यामध्ये गुजरातच्या गोलंदाजांचं मोठं योगदान होतं. गुजरात टायटन्सने दिलेल्या १६९ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना पहिल्याच षटकात ट्रॅव्हिस हेड शून्यावर बाद झाला. तर कगिसो रबाडाच्या गोलंदाजीवर अभिषेक शर्मा, इशान किशन व स्मरण रविचंद्रन हे फलंदाज बाद झाले. त्यानंतर जेसन होल्डर व प्रसिध कृष्णा यांनी हैदराबादच्या उर्वरित संघाला माघारी धाडलं. कर्णधार पॅट कमिन्सने सर्वाधिक १९ धावांची खेळी केली. पण कोणताच फलंदाज २० धावांचा पल्ला पार करू शकला नाही. गुजरातकडून कगिसो रबाडा व जेसन होल्डर यांनी सर्वाधिक ३-३ विकेट्स घेतल्या. तर प्रसिध कृष्णाने २ व सिराज-रशीदने १-१ विकेट्स घेतल्या. हैदराबादने नाणेफेक जिंकत प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला. शुबमन गिल व जोस बटलरला अनुक्रमे ५ व ७ धावांवर प्रफुल्ल हिंगेने माघारी धाडलं. पण साई सुदर्शनने संघासाठी महत्त्वपूर्ण अर्धशतकी खेळी केली.

साई सुदर्शन ४४ चेंडूत ५ चौकार व २ षटकारांसह ६१ धावा करत बाद झाला. तर निशांत सिंधूने १४ चेंडूत २२ धावांची झटपट खेळी केली. त्यानंतर वॉशिंग्टन सुंदरने ३३ चेंडूत ७ चौकार व एका षटकारासह ५० धावांची खेळी करत अर्धशतक झळकावलं.

## "मॅडम मोठा गोंधळ घालून गेल्यात...", बृजभूषण सिंह यांचं विनेश फोगाटबाबत मोठं वक्तव्य; म्हणाले, "खेळाडूला विनाकारण..."

**जयपूर/वृत्तसंस्था**

भारतीय कुस्ती महासंघाचे माजी अध्यक्ष बृजभूषण शरण सिंह यांनी मंगळवारी कुस्तीपटू विनेश फोगाटच्या विधानांवर प्रतिक्रिया दिली. विनेशने सोमवारी आरोप केला होता की भारतीय कुस्ती महासंघाकडून तिला महिला फ्रीस्टाईल प्रकारात स्पर्धा खेळण्याची परवानगी देण्यात आली नाही. २०२३ मध्ये विनेशसह सहा महिला कुस्तीपटूंनी बृजभूषण शरण सिंह यांच्यावर लैंगिक छळाचे आरोप केले होते. मात्र, या संपूर्ण वादावर प्रतिक्रिया देताना बृजभूषण म्हणाले की, "सोमवारी विनेशने मांडलेला विषय आता माझ्याशी संबंधित नाही."





"मॅडमने जो गोंधळ घालून गेल्या आहेत, तो सध्या मी साफ करत आहे. तसेच, कुस्तीची स्पर्धा कुठे होणार किंवा होणार नाही, हा विषय आता माझ्या अधिकारक्षेत्रात येत नाही. हा निर्णय पूर्णपणे सध्याच्या भारतीय कुस्ती महासंघाचा आहे. स्पर्धा कुठे आयोजित करायची, कोण खेळणार आणि कोण नाही, हे ठरवण्याचा अधिकार त्यांच्याकडे आहे," असं बृजभूषण शरण सिंह यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितलं. पुढे म्हणाले, "मी अनेक वर्षे महासंघाचा अध्यक्ष होतो. त्या अनुभवावरून एवढंच सांगू शकतो की महासंघ कधीही कोणत्याही खेळाडूला विनाकारण खेळण्यापासून रोखत नाही, कारण महासंघ हा खेळाडूंसाठीच असतो. जर एखाद्या खेळाडूला थांबवण्यात आलं असेल, तर त्यामागे काही कारण नक्कीच असेल आणि ते कारण संबंधित खेळाडूला सांगितलंही गेलं असेल." दरम्यान, भारतीय कुस्ती महासंघाने विनेश फोगाटला डोपिंगविरोधी नियमांचं उल्लंघन आणि शिस्तभंगाचे आरोप करत कारणे दाखवा नोटीस बजावली होती. तसेच तिला २६ जूनपर्यंत स्पर्धांमधून बंदी घालण्यात आली आहे. या नोटिसनंतर अवघ्या दोन दिवसांनी विनेश गोंडा येथे आयोजित राष्ट्रीय ओपन रँकिंग स्पर्धेसाठी पोहोचली. विशेष म्हणजे, एप्रिलच्या अखेरीसच तिने या स्पर्धेसाठी नोंदणी केली होती. पॅरिस ऑलिम्पिकमधील निराशेनंतर तब्बल दोन वर्षांनी पुनरागमन करण्याच्या तयारीत असलेल्या विनेश फोगाटला भारतीय कुस्ती महासंघाकडून सविस्तर कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. महासंघाने तिच्यावर शिस्तभंग आणि डोपिंगविरोधी नियमांचे उल्लंघन केल्याचे आरोप केले असून, २६ जूनपर्यंत देशांतर्गत स्पर्धांमध्ये सहभागी होण्यास अपात्र ठरवलं आहे. महिला फ्रीस्टाईल प्रकारासाठी पडताळणी प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी विनेश गोंडा येथे पोहोचली होती. मात्र, महासंघाने तिला आधी शनिवारी पाठवलेल्या नोटिसला सविस्तर उत्तर देण्यास सांगितलं. भारतीय कुस्ती महासंघाच्या मते, निवृत्तीनंतर पुनरागमन करणाऱ्या खेळाडूंना यूडब्ल्यूडब्ल्यूच्या डोपिंगविरोधी नियमांनुसार अनिवार्य सहा महिन्यांची नोटीस कालावधी पूर्ण करावा लागतो.

## मुंबई इंडियन्सने हार्दिक पंड्याला कर्णधारपदावरून काढून टाकलं?

**मुंबई)/वृत्तसंस्था**

आयपीएल २०२६ मधून मुंबई इंडियन्सचा संघ बाहेर पडला आहे. मुंबई इंडियन्सला आरसीबीविरुद्ध सामन्यात पराभवाचा धक्का बसला आणि त्यामुळे संघ स्पर्धेबाहेर झाला. संघाचा कर्णधार हार्दिक पंड्या पाठीच्या दुखापतीमुळे गेले काही सामने खेळलेला नाही. पण या दुखापतीदरम्यान तो संघाच्या डगआऊटमध्येही दिसून आला नाही. त्यामुळे विविध चर्चांना उधाण आलं आहे. याचदरम्यान आता हार्दिक पंड्याच्या गर्लफ्रेंडने टाकलेल्या इन्स्टा स्टोरीने सर्वांचं लक्ष वेधलं आहे.

हार्दिक पंड्या आणि मुंबई इंडियन्स यांच्या बिनसलं असल्याच्या चर्चांना सोशल मीडियावर पुन्हा नव्याने उधाण आलं आहे. हार्दिकची गर्लफ्रेंड माहिका शर्माने सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर केल्यानंतर या चर्चांना



आणखी हवा मिळाली. या पोस्टनंतर अशी चर्चा सुरू झाली आहे की, १४ मे रोजी पंजाब किंग्जविरुद्ध धर्मशालामध्ये होणाऱ्या आयपीएल २०२६ सामन्यापूर्वी हार्दिक पंड्या मुंबई इंडियन्सच्या संघासोबत गेला नाही.

माहिका शर्माच्या इन्स्टाग्राम स्टोरीचे स्क्रीनशॉट सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाले आहेत. अनेक चाहत्यांनी दावा केला की हार्दिक सध्या घरी आराम करत आहे आणि संघासोबत धर्मशाला येथे पोहोचलेला नाही. माहिकाने शेअर केलेल्या स्टोरीमध्ये हार्दिक पंड्या घरात उभा असून त्याच्या हातात मोठा फुलांचा गुच्छ दिसत असल्याचं चाहत्यांनी लक्षात आणून दिलं. माहिकाने शेअर केलेल्या या फोटमध्ये हार्दिकचा चेहरा दिसत नसला तरी तो फुलांचा गुच्छ घेतलेला व्यक्ती हार्दिकच असल्याचा दावा केला आहे. सध्या मुंबई इंडियन्सचा संघ धरमशालासाठी निघाला असताना हार्दिक पंड्या त्याच्या घरी आराम करत असल्याच्या चर्चा वेगाने पसरू लागल्या आहेत. बीसीसीआयने खेळाडूंना गर्लफ्रेंडसोबत प्रवास करण्यावर निर्बंध घातल्यानंतर मुंबई इंडियन्स आणि हार्दिक पंड्या यांच्यात मतभेद असल्याच्या अफवाही सोशल मीडियावर फिरत आहेत. मात्र, याबाबत कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही.

सोशल मीडियावर अनेक पोस्टसमध्ये हार्दिक पंड्या पंजाब किंग्जविरुद्धचा सामना खेळणार नसल्याचे दावे केले जात आहेत. काही पोस्टसमध्ये तर मुंबई इंडियन्सने हार्दिकला कर्णधारपदावरून हटवलं असून दुखापतीचं कारण केवळ त्याची प्रतिमा वाचवण्यासाठी पुढे केलं जात असल्याचंही म्हटलं जात आहे. याआधीही रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुविरुद्धच्या रायपूरमधील सामन्यासाठी हार्दिक पंड्या सुरुवातीला संघासोबत गेला नव्हता. मात्र, नंतर तो त्याच्या गर्लफ्रेंड माहिका शर्मासोबत रायपूरला पोहोचला होता. त्यामुळे यावेळीही तो नंतर धरमशालामध्ये संघात सामील होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. सध्या हार्दिक पंड्याच्या उपलब्धतेबाबत किंवा तो संघासोबत नसल्याबाबत मुंबई इंडियन्स किंवा स्वतः हार्दिककडून कोणतंही अधिकृत वक्तव्य करण्यात आलेलं नाही. मुंबई इंडियन्सचा पंजाब किंग्जविरुद्धचा सामना १४ मे रोजी धरमशालामध्ये होणार असून, हार्दिक उद्या किंवा थेट सामन्याच्या दिवशीही संघात सामील होऊ शकतो.

# अभिनेत्रीने सुरू केला कॅफे, उषा नाडकर्णींनी केलं उद्घाटन

**मुंबई :** मनोरंजन विश्वातील अनेक कलाकार मंडळी आता अभिनयासह उद्योग क्षेत्रातही पाऊल टाकत आहेत. मराठीसह हिंदी कलाविश्वातील अनेक कलाकारांनी अभिनय क्षेत्रात कार्यरत असण्याबरोबरच उद्योग क्षेत्रात आपली नवी सुरुवात केली आहे. कोणी स्वत:चा साड्यांचा ब्रँड, कुणी दागिन्यांचा ब्रँड, कुणी स्वत:चं सेलॉन सुरू केलं, तर कुणी स्वत:चं हॉटेल.

अशातच आता यात आणखी एका लोकप्रिय टीव्ही अभिनेत्रीची भर पडली आहे, ही अभिनेत्री म्हणजे अर्चना गौतम. बिग बॉस १६ आणि 'सेलिब्रिटी मास्टरशेफ' या शोमधून प्रसिद्धीझोतात आलेली अर्चना गौतम आता बिझनेसवूमन झाली आहे. अभिनेत्रीने नुकतंच स्वत:चा कॅफे सुरू केला आहे. दिवाळीच्या शुभमुहूर्तावर तिनं आपल्या या नवीन कॅफेची सुरुवात केली आहे.

र्चनानं सुरू केलेल्या या नवीन कॅफेचं उद्घाटन ज्येष्ठ मराठी अभिनेत्री उषा नाडकर्णी यांच्या हस्ते पार पडलं. याचे काही खास फोटो अर्चनानं आपल्या सोशल मीडिया अकाउंटद्वारे शेअर केले आहेत. तसंच अर्चनानं उषा नाडकर्णींचे आभारही मानले आहेत. अर्चना म्हणते, जे लोक आपले असतात,



ते नेहमीच आपल्याशी मनानं जोडलेले राहतात. उषा नाडकर्णी तुमचे मन:पूर्वक आभार. दिवाळीच्या शुभप्रसंगी Oye Churros कॅफेचे उद्घाटन तुमच्या हातून झालं ही आमच्यासाठी आनंदाची आणि सन्मानाची गोष्ट आहे. या नव्या प्रवासासाठी तुमचे आशीर्वाद मिळणं, ही खूप सुंदर सुरुवात आहे.

अर्चनानं शेअर केलेल्या या नव्या कॅफेच्या फोटोंवर प्रेक्षकांनी कमेंट्सद्वारे तिचं कौतुक केलं आहे. तसंच तिच्या या नव्या सुरुवातीसाठी तिला खास शुभेच्छाही दिल्या आहेत. दरम्यान, बिझनेसवूमन झालेली अर्चना ही सध्याच्या लोकप्रिय टीव्ही अभिनेत्रींपैकी एक आहे. तिनं मॉडेल म्हणून आपल्या करिअरची सुरुवात केली. २०१५ मध्ये आलेल्या 'ग्रेट ग्रँड मस्ती' या बॉलीवूड चित्रपटातील एका छोट्या भूमिकेतून तिनं अभिनय क्षेत्रात पाऊल टाकलं. यानंतर तिनं 'हसीना पारकर' आणि 'बारात कंपनी'सारख्या चित्रपटांमध्येही काम केलं आहे.

चित्रपटांबरोबरच अर्चना 'साथ निभाना साथिया' आणि 'ये है आशिकी'सारख्या टीव्ही मालिकांमध्येही दिसली आहे. मालिका आणि चित्रपटानंतर तिनं आपला मोर्चा रिॲलिटी शोकडे वळवला. ती 'बिग बॉस १६'मध्ये सहभागी झाली होती आणि नंतर 'खतरों के खिलाडी'मध्येही ती दिसली. शिवाय नुकताच तिनं 'सेलिब्रिटी मास्टरशेफ' हा शोदेखील केला. यानंतर आता अर्चनाने व्यवसाय क्षेत्रात आपली नवीन सुरुवात केली आहे. तिनं स्वत:चा कॅफे सुरू केला आहे.

# महेश कोठारे यांच्या समर्थनार्थ मेघा धाडेची पोस्ट चर्चेत

**मुंबई :** अलीकडेच अभिनेते, निर्माते महेश कोठारे यांच्या एका व्हायरल व्हीडियोनंतर जोरदार चर्चा सुरू झाल्या आहेत. या व्हीडियोमध्ये महेश कोठारे हे भाजपावर स्तुतिसुमने उधळताना दिसत आहेत. एका कार्यक्रमात त्यांनी मी मोदी भक्त आहे आणि मुंबई महापालिकेत कमळच फुलेल असे वक्तव्य केले. तसेच त्यांनी संजय राऊत आणि माजी महापौर किशोरी पेडणेकर यांच्यावरही टीका केली.



यानंतर महेश यांच्यावर अनेकानी टीका केल्या. पण अभिनेत्री मेघा धाडेने मात्र महेश यांची पाठराखण केली आहे. मेघा यांनी सोशल मीडिया पोस्ट केली आहे. ज्यात त्या म्हणतात, 'अभिनेत्री उर्मिला मातोंडकरने उध्दव सेना जॉइन केली होती तेव्हा कोणत्याही भाजप प्रवक्त्याने तिच्या व्यक्तिस्वातंत्र्यावर आक्षेप घेतला नव्हता, सुप्रसिद्ध दिग्दर्शक महेश मांजरेकरने तर मनसेच्या तिकिटावर लोकसभा लढवली होती तरी कोणी आक्षेप घेतला नाही.

परंतु महेश कोठारेंनी मोदींची तारीफ केली की उध्दव सेनेला इंगळ्या डसल्या कोठारेंवर टीकेची झोड उठवली गेली ! त्यांच्या मराठीपणावर देखील शंका घेण्यात आली. हे असे झाले कारण कोठारे जे बोलले ते मनापासून बोलले कोणत्या तिकीटाच्या लालसेपोटी, कोणाचे पाकीट मिळवण्यासाठी ते असे बोलले नाही एक सामान्य मुंबईकरांची जी भावना आहे जो मुंबईकर आधी रस्त्यावर धक्के खायचा तो आता मेट्रोत गार वाऱ्यात वेगाने प्रवार, करतोय जो मुंबईकर आधी ट्रॅफिक मध्ये अडकायचा आता तो अटल सेतूवरून सुसाट धावतोय त्या मुंबईकरांच्या भावनांचे प्रगटीकरण कोठारेंच्या भाषणात झाले आणि म्हणूनच उध्दव सेनेच्या पायाखालची जमीन सरकली ! आणि हे सत्यात देखील उतरणार आहे.'या पोस्टवर अभिनेते शरद पोंक्षे यांनीही कमेंट केली आहे. ते आपल्या पोस्टमध्ये म्हणतात, मीही मोदांचं कौतुक करतो अमित शहांच कौतूक करतो.जेजे चांगले आहेत त्यांचं करतो. सद्य परिस्थितीत भाजप शिवाय देशाला पर्याय नाही माझं मत मांडले. द्या किती शिव्या द्यायच्यात त्या.' तर अनेकांनी या पोस्टवर तिने राजकारणात उतरु नये अशीही कमेंट केली आहे.

# हास्याचा फवारा घेऊन येणार किस किस को प्यार करु २

**मुंबई :** कॉमेडीयन कपिल शर्माचा नव्या चित्रपटाचे मोशन पोस्टर रिलीज झाले असून प्रदर्शनची तारीख आणि कलाकार देखील कोण असतील, हे कन्फर्म करण्यात आले आहे. कपिल शर्माचा किस किस को प्यार करू हा चित्रपट २०१५ मध्ये रिलीज झाला होता. आता पुन्हा मोठ्या पड्यावर या चित्रपटाचा सीक्वल येतोय. निर्मात्यांनी चित्रपटाचे मोशन पोस्टर जारी करत रिलीज डेटची अधिकृत घोषणा केलीय.

चित्रपटाचे नवे पोस्टर नुकतेच रिलीज करण्यात आले असून त्यात कपिल शर्मा पुन्हा एकदा आपल्या खास स्टाईलमध्ये दिसत आहे. सोशल मीडियावर हा पोस्टर व्हायरल झालाय. 'किस किसको प्यार करूं' या चित्रपटात कपिलची तीन पत्नी आणि एक गर्लफ्रेंड अशा विनोदी



गोंधळावर आधारित कथा होती. या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर चांगली कमाई करत कपिलचा सिनेमॅटिक डेब्यू सुपरहिट ठरला होता. आता दुसऱ्या भागात कपिलच्या व्यक्तिरेखेत आणखी भन्नाट ट्विस्ट असणार असल्याचं दिग्दर्शकांनी सांगितलं आहे.

# थामा Vs एक दिवाने की दिवानियत, बॉक्स ऑफिसवर कोणता सिनेमा ठरला वरचढ?

**मुंबई :** सध्या बॉक्स ऑफिसवर 'एक दिवाने की दिवानियत' व 'थामा' या सिनेमांचा जलवा पाहायला मिळतोय. दोन्ही चित्रपटांना प्रेक्षकांचा उत्तम प्रतिसाद मिळतोय. त्यामुळे दोन्ही चित्रपट चांगली कामगिरी करत आहेत. २१ ऑक्टोबरला रिलीज झालेल्या 'एक दिवाने की दिवानियत' व 'थामा'ने तीन दिवसांत किती कमाई केली, ते जाणून घेऊयात.

आयुष्मान खुराना आणि रश्मिका मंदाना यांच्या 'थामा' या चित्रपटाने प्रेक्षकांची मने जिंकली आहेत. हा चित्रपट पाहण्यासाठी प्रेक्षक चित्रपटगृहांमध्ये गर्दी करत आहेत. या हॉरर कॉमेडीने रिलीजच्या फक्त तीन दिवसांतच जबरदस्त कमाई केली आहे. या चित्रपटाने अनेक सिनेमांचे रेकॉर्ड मोडले आहेत. सॅकनिल्कच्या आकडेवारीनुसार, 'थामा' ने रिलीजच्या पहिल्या दिवशी २४ कोटी कमावले. दुसऱ्या दिवशी थामाच्या कमाईत घसरण झाली आणि १८.६ कोटींचे कलेक्शन केले. थामाने रिलीजच्या तिसऱ्या दिवशी १२.५० कोटी कमावले. थामाचे तीन दिवसांचे कलेक्शन




५५.१० कोटींवर पोहोचले आहे.

थामाने काजोलच्या 'मा' सिनेमाच्या लाइफटाइम कलेक्शनला मागे टाकले आहे. 'मा' ने भारतात ३६.०८ कोटी आणि जगभरात ४९.७५ कोटी कमावले. आता थामा लवकरच वरुण धवनच्या 'भेडिया' ला मागे टाकेल. भेडियाने भारतात ६८.९९ कोटींचे कलेक्शन केले होते. सनम तेरी कसम फेम हर्षवर्धन राणे व सोनम बाजवा यांच्या 'एक दिवाने की दिवानियत'ने देखील बॉक्स ऑफिसवर चांगली कमाई केली आहे. सिनेमाने पहिल्या दिवशी ९ कोटी कमावले, दुसऱ्या दिवशी ७.५ कोटी कमावले आणि तिसऱ्या दिवशी ६ कोटी रुपये कमावले. 'एक दिवाने की दिवानियत'चे तीन दिवसांचे कलेक्शन २२.७५ कोटी रुपये झाले आहे. 'एक दिवाने की दिवानियत'ने होमबाउंड (४.५७ कोटी), द बंगाल फाइल्स ९ (१९.५९ कोटी), निकिता रॉय (१.२८ कोटी), आंखों की गुस्ताखियां (१.८० कोटी), केसरी वीर (१.८८ कोटी), कंपकंपी (१.५० कोटी), द भूतनी (१२.५२ कोटी), फुले (६.७६ कोटी), ग्राउंड झिरो (७.७७ कोटी), क्रेझी (१४.०३ कोटी), सुपरबॉयज ऑफ मालेगाव (५.३२ कोटी), मेरे हसबंड की बीवी (१२.२५ कोटी), लव्हयापा (७.६९ कोटी) आणि इमर्जन्सी (२०.४८ कोटी) या चित्रपटांच्या लाइफटाइम कलेक्शनला मागे टाकलं आहे.

## हार्दिकने माहिकाचे रिलेशनशीप केले कन्फर्म!

**मुंबई :** भारतीय क्रिकेटपटू हार्दिक पांड्या पुन्हा एकदा चर्चेत आला आहे, मात्र या वेळी कारण क्रिकेट नव्हे तर त्याचं खासगी आयुष्य आहे. अलीकडेच हार्दिकने सोशल मीडियावर काही खास फोटो शेअर केले आहेत, ज्यातून त्याने मॉडेल माहीका शर्मासोबतचं नातं अधिकृत केल्याचं स्पष्ट होत आहे. क्रिकेट विश्वातील हा नवा 'लव्ह एंगल' सध्या सोशल मीडियावर ट्रेंड होत आहे. काही तासांतच फोटोंना लाखो लाईक्स आणि हजारो कमेंट्स मिळाल्या आहेत. हार्दिकचा हा रोमँटिक अंदाज पाहून चाहत्यांमध्ये चर्चेला उधाण आलं आहे. माहीका शर्मा ही ग्लॅमरस मॉडेल असून, तीने अनेक जाहिराती आणि म्युझिक व्हिडिओंमध्ये काम केलं आहे. दोघांच्या अफेअरच्या चर्चा काही आठवड्यांपासून सुरु होत्या, मात्र आता हार्दिकने स्वतःचं नातं ऑफिशियल केल्याने या चर्चांना पूर्णविराम लागला आहे. हार्दिक पांड्याने आधी अभिनेत्री नताशा स्टेनकोविकशी लग्न केले होते.

# नाशिक त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा बोध चिन्हाचे मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री आणि मान्यवरांच्या हस्ते अनावरण

जनसंचलन बुलढाणा

नाशिक त्र्यंबकेश्वर येथे २०२७ मध्ये सिंहस्थ कुंभमेळा आयोजित होत आहे. या कुंभमेळ्याच्या बोधचिन्हाचे अनावरण सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कुंभमेळ्याच्या लोगोसाठी कुंभमेळा प्राधिकरणाच्यावतीने स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत सुमारे तीन हजारांहून अधिक स्पर्धकांनी सहभाग घेतला. या स्पर्धकांमधून तीन उत्कृष्ट स्पर्धकांचा यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यामध्ये प्रथम क्रमांक पटकावलेल्या पुणे येथील सुमित काटे यांना तीन लाख रुपयांचा धनादेश आणि सन्मानचिन्ह, द्वितीय क्रमांक पटकावलेल्या नोएडा येथील मयांक नायक यांना दोन लाख रुपयांचा धनादेश आणि सन्मानचिन्ह आणि तृतीय क्रमांक पटकावलेल्या पंढरपूर येथील पीयुष पिंपळनेरकर यांचा एक लाख रुपयांचा धनादेश आणि सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. प्रसून जोशी, अश्विनी देशपांडे, मंदार राणे, वृषाली केकणे (देशमुख), बारिश दाते, विनय नारंग, डॉ. प्राजक्ता बास्ते, प्रफुल्ल सावंत, डॉ. दिनेश वैद्य, अँथनी लोपेझ आणि डॉ. किरण शिंदे यांसारख्या दिग्गज डिझाइन तज्ज्ञांच्या समितीने या प्रवेशिकांचे परिक्षण केले. सर्जनशीलता, नाविन्य, ब्रँड सुसंगतता आणि सादरीकरण या निकषांवर आधारित ही निवड करण्यात आली. या समितीचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. प्राधिकरणाचे आयुक्त शेखर सिंह यांनी प्रास्ताविकाद्वारे कुंभमेळा आयोजन आणि लोगो स्पर्धेबाबत माहिती दिली. यावेळी कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन, अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, उद्योग मंत्री उदय सामंत, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, नाशिक विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम, कुंभमेळा प्राधिकरण आयुक्त शेखर सिंह यांच्यासह विविध आखाड्यांचे साधू, संत उपस्थित होते. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांनी यावेळी उपस्थित साधू संतांचे स्वागत केले. नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण, मायगव्ह आणि असोसिएशन ऑफ डिझाइनर्स ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या देशव्यापी डिझाइन स्पर्धेतून या बोधचिन्हाची निवड करण्यात आली. २० नोव्हेंबर ते २० डिसेंबर २०२५ या कालावधीत मायगव्ह प्लॅटफॉर्मवर पार पडलेल्या या स्पर्धेत ७० आंतरराष्ट्रीय स्पर्धकांसह एकूण ३,०६७ प्रवेशिका प्राप्त झाल्या होत्या. सहभागाच्या बाबतीत महाराष्ट्र राज्य आघाडीवर राहिले, त्याखालोखाल दिल्ली आणि तामिळनाडूचा क्रमांक लागला. १८ ते २४ वयोगटातील तरुणांनी या स्पर्धेत सर्वाधिक सक्रिय सहभाग नोंदवला.

# सार्वजनिक आरोग्य विभागाच्या बदल्या समुपदेशनाद्वारे; बदल्यांचे वेळापत्रक जाहीर

जनसंचलन/बुलढाणा

सार्वजनिक आरोग्य विभागातील गट-ब, गट-क आणि गट-ड कर्मचाऱ्यांच्या सर्वसाधारण बदल्यांसाठी समुपदेशन प्रक्रियेला गती देत स्वतंत्र शासन निर्णय निर्गमित करण्यात आला असून बदल्यांचे महत्वपूर्ण वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर आणि राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही प्रक्रिया अधिक पारदर्शक व सुसूत्र करण्यावर भर देण्यात आला आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या १५ एप्रिल २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार समुपदेशनाद्वारे सर्वसाधारण बदल्या करण्याची कार्यपद्धती निश्चित करण्यात आली आहे. त्यानुसार संचालक, आरोग्य सेवा यांनी राज्यातील आठ परिमंडळांतील सर्व कार्यक्रम प्रमुखांच्या बदल्यांसाठी टप्प्याटप्प्याने वेळापत्रक निश्चित केले आहे. जाहीर करण्यात आलेल्या वेळापत्रकानुसार रिक्त पदांची यादी ६ मे २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आली असून, बदलीपात्र कर्मचाऱ्यांची सेवा ज्येष्ठता यादी ८ मे रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे. तसेच प्रपत्र १ ते ५ तयार करून १० मे रोजी नागरी सेवा मंडळासमोर सादर करण्यात आले. नागरी सेवा मंडळाकडून समुपदेशनाद्वारे बदल्यांचे अंतिम प्रस्ताव १५ मेपर्यंत पाठविण्यात येणार असून, अंतिम बदली आदेश ३१ मे रोजी संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येणार आहेत. दरम्यान, संपूर्ण बदली प्रक्रियेवर देखरेख ठेवण्यासाठी चार वरिष्ठ अधिकाऱ्यांची निरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. नव्या धोरणानुसार बदल्या करताना सेवा कालावधी, प्राधान्यक्रम, पसंतीक्रम, प्रशासकीय गरज तसेच दुर्गम भागातील सेवेला विशेष महत्त्व देण्यात येणार आहे. याशिवाय अपंग कर्मचारी, गंभीर आजारांनी ग्रस्त कर्मचारी, विधवा महिला, पती-पत्नी एकत्रीकरण आणि शैक्षणिक कारणे यांसारख्या मानवी बाबींनाही प्राधान्य देण्यात आले आहे.

# मॉडेल डिग्री कॉलेजच्या नूतन इमारतीचे आज भूमिपूजन

जनसंचलन/बुलढाणा

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ संचालित मॉडेल डिग्री कॉलेज, बिरसिंगपूर, बुलढाणा येथील नूतन इमारतीचा भूमिपूजन सोहळा गुरुवार दि. १४ मे २०२६ रोजी सकाळी ११ वाजता आयुष (स्वतंत्र प्रभार), आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव आणि युवक कल्याण व क्रीडा राज्यमंत्री रक्षाताई खडसे यांचे शुभहस्ते मॉडेल डिग्री कॉलेज परिसर, अजिंठा रोड, ग्राम-बिरसिंगपूर, बुलढाणा येथे संपन्न होणार आहे. भूमिपूजन सोहळ्याचे अध्यक्षस्थान विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते भूषविणार असून प्रमुख अतिथी म्हणून राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री तथा बुलढाणा जिल्ह्याचे पालकमंत्री मकरंद जाधव (पाटील), वस्त्रोद्योग मंत्री तथा बुलढाणा जिल्ह्याचे सहपालकमंत्री संजय सावकारे व महाराष्ट्र राज्याचे कामगार मंत्री तथा अकोला जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर तसेच आमदार किरण सरनाईक, वसंत खंडेलवाल, धीरज लिंगाडे, चैनसुख संचेती, डॉ. संजय कुटे, संजय गायकवाड, श्वेता महाले, सिद्धार्थ खरात, मनोज कायंदे, नगरपरिषद अध्यक्ष पूजा संजय गायकवाड, बिरसिंगपूर सरपंच वैशाली संजय शिंदे व विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांची प्रामुख्याने उपस्थिती लाभणार आहे. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ संचालित मॉडेल डिग्री कॉलेज, बिरसिंगपूर, बुलढाणा येथील नूतन इमारतीचा भूमिपूजन सोहळ्याला सर्वांनी जास्तीतजास्त संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. अविनाश असनारे व मॉडेल डिग्री कॉलेज, बुलढाणाचे मानद संचालक डॉ.ए.आर. म्हळसने यांनी केले आहे.

# २० मे रोजीच्या औषध विक्रेता बंदच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासन सज्ज...

## औषध पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी उपाययोजना

जनसंचलन बुलढाणा

अखिल भारतीय औषधी विक्रेता संघटना यांच्या वतीने बुधवार दि. २० मे २०२६ रोजी देशव्यापी एक दिवसीय औषध विक्रेता बंदची घोषणा करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात नागरिकांना आवश्यक औषधांचा पुरवठा सुरळीत व अखंडपणे उपलब्ध राहावा यासाठी अन्न व औषध प्रशासन, बुलढाणा कार्यालयामार्फत आवश्यक उपाययोजना करण्यात येत असल्याची माहिती सहाय्यक आयुक्त (औषधे) गजानन प्र. घिरके यांनी दिली. देशातील ठोक व किरकोळ औषध विक्रेत्यांनी त्यांच्या प्रलंबित मागण्यांच्या निषेधार्थ हा बंद पुकारला असून, नागरिकांना कोणतीही गैरसोय होऊ नये यासाठी प्रशासन सतर्क झाले आहे. सह आयुक्त (औषधे), अन्न व औषध प्रशासन, मुंबई यांच्या निर्देशानुसार जिल्ह्यातील सर्व औषध विक्रेते, रुग्णालयांशी संलग्न औषध दुकाने तसेच २४ तास सुरू असणाऱ्या औषध दुकानांशी समन्वय साधण्यात येत आहे. अत्यावश्यक औषधांचा पुरवठा खंडित होऊ नये यासाठी संबंधितांना पुरेसा औषध साठा उपलब्ध ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच जिल्हाधिकारी कार्यालय, पोलीस प्रशासन, जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी,



इंडियन मेडिकल असोसिएशन तसेच खाजगी व निमसरकारी रुग्णालयांशी सतत संपर्क ठेवून आवश्यक खबरदारी घेण्यात येत आहे. प्रत्येक तालुका व गाव पातळीवर आवश्यक औषध दुकाने सुरू राहतील यासाठी प्रशासन प्रयत्नशील असून नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहनही प्रशासनाने केले आहे. औषध पुरवठ्याबाबत कोणतीही अडचण उद्भवल्यास अन्न व औषध प्रशासन, बुलढाणा कार्यालयात नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आला आहे. नागरिकांनी ९८५०१५०६८७, ७७२००४५०८५, ९९२२८९९९५८ किंवा ८२६२८७८८९५ या क्रमांकांवर संपर्क साधावा. तसेच . या ई-मेलवरही संपर्क साधता येणार आहे.



# भूमी अभिलेख कार्यालयातील लाचखोर रंगेहात पकडले!

**जनसंचलन/ जळगाव जामोद**

येथे भूमी अभिलेख कार्यालयातील भ्रष्टाचाराचा भांडाफोड करत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने धडक कारवाई केली. भूखंड मोजणी अर्जातील त्रुटी काढून टाकण्यासाठी आणि प्रक्रिया जलद करण्याच्या नावाखाली तब्बल १० हजार रुपयांची लाच मागणाऱ्या दोन कर्मचाऱ्यांना १२ मे रोजी सापळा रचून रंगेहात अटक करण्यात आली. तक्रारदाराने वडिलांच्या नावावरील भूखंडासाठी शासकीय शुल्क भरून अर्ज केला होता. मात्र अर्जात त्रुटी असल्याचे सांगत परिरक्षक भूमापक विश्वजीत सोनवणे यांनी लाचेची मागणी केली. पुढे त्यांनी कार्यालयीन सहाय्यक सचिन वाजपे यांच्याकडे पाठवले, ज्यांनीही तीच मागणी कायम ठेवली. तक्रारदाराने याबाबत लाचलुचपत विभागाकडे तक्रार दाखल केली. पडताळणीनंतर १२ मे रोजी सापळा रचण्यात आला आणि दोघांनाही प्रत्यक्ष पैसे स्वीकारताना पकडण्यात आले. या घटनेमुळे महसूल विभागातील भ्रष्टाचार पुन्हा एकदा उघड झाला असून नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. संबंधित आरोपींवर भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून पुढील तपास सुरू आहे



# माटरगाव येथे उद्या छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबीर

**जनसंचलन/बुलढाणा**

महसूल व वन विभागाच्या निर्देशानुसार शेगाव तालुक्यातील माटरगाव मंडळात शुक्रवार, दि. १५ मे २०२६ रोजी सकाळी ९ वाजता जि.प. हायस्कूल, माटरगाव बु. येथे छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबीर आयोजित करण्यात आले आहे. या शिबिरामध्ये नागरिकांना महसूल, कृषी, आरोग्य, पुरवठा, निवडणूक व विविध शासकीय योजनांशी संबंधित सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. शिबिरात ७/१२ व ८-अ उताऱ्यांचे वाटप, विविध फ ेरफार नोंदी, जिवंत ७/१२ अंतर्गत नोंदी, विस्तारित जिवंत ७/१२ योजनेअंतर्गत अर्ज स्वीकारणे, सलोखा योजना तसेच पी.एम. किसान योजनेअंतर्गत पात्र शेतकऱ्यांचे लँड सीडिंग करण्यात येणार आहे. याशिवाय नैसर्गिक आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांचे ई-केवायसी, फेरफार अदालत, ॲग्रीस्टॅक अंतर्गत शेतकरी ओळख क्रमांक तयार करणे, ई-हक्क प्रणाली अंतर्गत अर्ज स्वीकारणे, ई-पीक पाहणी, ई-चावडीद्वारे जमीन महसूल वसुली आदी सेवा देण्यात येतील. शिबिरात नवीन आधार नोंदणी व आधार अद्ययावत करणे, उत्पन्न, जात, नॉन-क्रीमीलेयर, राष्ट्रीयत्व, वय व अधिवास प्रमाणपत्रांसाठी ई-अर्ज स्वीकारले जाणार आहेत. तसेच संजय गांधी योजना, रेशनकार्ड संदर्भातील अर्ज, नवीन मतदान ओळखपत्र नोंदणी व दुरुस्ती, आधार-मतदान जोडणी अर्ज स्वीकारण्यात येणार आहेत. आरोग्य विभागामार्फत आभा कार्ड, डिजिटल हेल्थ कार्ड, प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा फुले जन आरोग्य योजना संदर्भातील अर्ज प्रक्रिया करण्यात येणार आहे. कृषी विभागाच्या विविध योजनांसाठी अर्ज स्वीकारणे, शेततळे योजना, पंतप्रधान आवास योजना व इतर घरकुल योजनांचे अर्ज तसेच जन्म, मृत्यू व विवाह नोंदणी प्रमाणपत्रांसाठी अर्ज स्वीकारले जाणार आहेत. या शिबिरांचा माटरगाव मंडळातील सर्व नागरिकांनी तसेच शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन शेगाव तहसीलदार यांनी केले आहे.

## ॥ चॅट ॲण्ड स्नॅक्स् सेंटर साठी जागा भाडेतत्वावर देणे आहे

संस्थेच्या मालकीची मलकापूर रोडवरील बुलडाणा अर्बन रेसीडेन्सी क्लबच्या दर्शनी भागात पक्के बांधकाम केलेली जहाजाच्या आकाराची चॅट ॲण्ड स्नॅक्स् सेंटर साठी बांधलेली दोन मजली अंदाजे २५०० ते ३००० चौ. फुटाची वास्तु भाडेतत्वावर देणे आहे. तरी इच्छूकांनी अपेक्षीत भाड्यासह आपल्या निविदा जाहीरात प्रकाशीत झाल्यापासून सात दिवसात संस्थेच्या मुख्यालयात सादर कराव्या.

**सरव्यवस्थापक**
बुलडाणा अर्बन को-ऑप.
क्रेडीट सोसायटी म. सहकार सेतु,
हूतात्मा गोरे पथ, बुलडाणा

# केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्याकडून छत्रपती संभाजी महाराजांना अभिवादन



**जनसंचलन/बुलढाणा**

धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त बुलढाणा शहरातील जयस्तंभ चौक परिसरात उत्साहपूर्ण वातावरणात जन्मोत्सव सोहळा पार पडला. यावेळी केंद्रीय आयुष (स्वतंत्र प्रभार) तथा आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. बुलढाणा शहरातील जयस्तंभ चौक येथे छत्रपती संभाजी महाराज यांचे स्मारक उभारण्यात आले असून, आज सकाळी पारंपरिक पद्धतीने जन्मोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी संभाजी महाराजांच्या पुतळ्याला पंचामृताने अभिषेक करण्यात आला. तसेच एका बालकाला संभाजी महाराजांच्या रूपात पाळण्यात ठेवून सुवासिनींनी पाळणागीत गायले व त्याचे ङ्गसंभाजी राजेफ असे नामकरण करण्यात आले.यानंतर केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी स्मारकातील पुतळ्यास पुष्पमाल्य अर्पण करून अभिवादन केले. कार्यक्रमास आमदार संजय गायकवाड, नगराध्यक्षा पूजाताई गायकवाड, नगर परिषदेचे गटनेते मृत्युजय गायकवाड, ओमसिंग राजपूत, सोनू जाधव यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८